# प्रेसनोट

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/ ५५४१ /२०१८ पुणे शहर, दिनांक – ०८/०६/२०१८

**विषय :- फुटपाथवर वाहन पार्कींग व वाहन चालविले बाबत करण्यात आलेली कारवाई.**

--------oo--------

पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरीता व वाहतूक सुरळीत व सुरक्षीत चालणेकरीता तसेच पादचारी यांना फुटपाथवरुन सुरक्षीत चालण्याकरीता वाहतूक शाखेकडून वारवांर वेगवेगळया कलमांखाली विशेष मोहिमांचे आयोजन केले जाते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये विविध प्रकरणे व विशेष बाब प्रकरण १४ रस्ते मधील कलम २०८ चे १(ब) अन्वये शहरातील रहदारीस अडथळा आणल्याबद्दल निर्बंध असलेल्या क्षेत्रात वाहन पार्क केल्याबद्दल पुणे महानगरपालिका यांनी ठराव क्र. १६ दिनांक- २०/०५/२०१० अन्वये अधिकार व सुपूर्तीस मान्यता दिलेवरुन तसेच रोड रेग्युलेशन रुल्स १९८९ कलम-१५(२)(२)/१७७ प्रमाणे फुटपाथवर वाहने पार्क व चालविणा-या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येत आहे. सदर बाबत दिनांक-२७/०५/२०१८ ते ०७/०६/२०१८ रोजी पर्यंत विशेष मोहिम राबविण्यात आली असुन आजपर्यंत फुटपाथवर वाहने पार्क करणा-या १६२० वाहनचालकांवर कारवाई करुन २८६४००/- रु. व फुटपाथवर वाहने चालविणा-या ५६२ वाहनचालकांवर कारवाई करुन ११३४००/- रु. तडजोड रक्कम वसुल केली आहे. तसेच सदरची विशेष मोहिम यापुढेही चालू राहणार आहे.

तरी नागरीकांना याव्दारे असे आवाहन करण्यात येते की, पुणे शहरातील फुटपाथ हे नागरीकांना पायी चालण्यासाठी असून त्यावरुन वाहने चालवू नयेत तसेच वाहने पार्क करु नयेत वाहतूक सुरळीत व सुरक्षीत ठेवणेकरीता वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करून वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.


MH 12 PW 1362
ROYAL ENFIELD
Aoteman


MH 12 EP 4628